क्र: एसडब्ल्यूएम १०८५/सीआर-३४/फ-६,

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३ फेब्रुवारी, १९८६.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक [संधारण],
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- आरागिरणी नियमावली.

वरील विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयाचे दिनांक:३१.१२.१९८५ चे कक्ष-११/सॉमील/४३२/८४-८५/७६७ या क्रमांकाचे पत्र संदर्भासाठी पहावे.

२. संदर्भाधीन पत्रानुसार आपण पुढीलप्रमाणे दोन प्रस्ताव शासनाच्या आदेशार्थ सादर केले आहेत. या बाबतच्या नियमात योग्य ती सुधारणा करण्याचा प्रस्तावही आपण सादर केला आहे.

१] अस्तित्वात असलेल्या आरागिरणी यंत्राच्या संख्येत जर वाढ करावयाची असेल किंवा अधिक क्षमती यंत्र बसवायचे असेल, तर त्यापूर्वी आरागिरणी मालकाने वन विभागाची पूर्व परवानगी घ्यावी असे बंधन असावे. आरागिरणी यंत्राची वाढ किंवा बदल करण्यास परवाना देण्याचे अधिकार ज्या त्या वनवृत्तातील वनसंरक्षक यांना असावे.

२] परवाना दिलेल्या आरागिरणीचे मूळस्थान जर बदलायचे असेल, तर त्याबाबत परवाना देण्याचा अधिकार कोणाकडे राहील या विषयी प्रचलित नियमात काही तरतूद नाही, तरी सदरचे अधिकार कोणाकडे असावे, हे स्पष्ट व्हावे.

३] वरील [१] च्या संदर्भात आपले लक्ष मुंबई वन नियम, १९४२ च्या नियम ८८ च्या उपनियम ६[१] कडे, तसेच सदर नियमासोबत जोडलेल्या अनुसूचि इ-इ अनुसार विहीत केलेल्या परवान्याच्या नमुन्यातील अट क्रमांक दोन कडे वेधण्यात येत आहे. तेथे नमूद केलेल्या तरतुदीनुसार हे स्पष्ट होते की, अस्तित्वात असलेल्या आरागिरणी यंत्राच्या संख्येत वाढ करावयाची असेल अथवा बदल करावयाचा असेल तर त्यासाठी आरागिरणी मालकाने वन विभागाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मूळ परवाना मंजूर करणारे अधिकारी, म्हणजेच मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे हेच अशा प्रकरणी परवानगी देण्यासाठी सक्षम अधिकारी असतील, आणि म्हणून, ते देण्याचे अधिकार संबंधित वनवृत्तातील वनसंरक्षकांना प्रदान करण्याचा प्रस्ताव मान्य करता येणार नाही.

४] वरील [२] च्या संदर्भात आपले लक्ष वर नमूद केलेल्या मुंबई वन नियम, १९४२ च्या नियम क्रमांक:८८ सोबतच्या अनुसूची इ-इ मधील अट क्रमांक: ३ कडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार अनुज्ञप्ती प्राधिकारी म्हणजेच विभागीय वन अधिकाऱ्यांच्या पूर्व अनुमतीने आरागिरणीचे स्थान बदलण्याची तरतूद करण्यात आली आहे. परंतु एखाद्या आरागिरणीचे स्थान वनविभागीय क्षेत्रात

.........२

प्रस्तुत नियमात स्थानांतर अध्याहृत धरले आहे. याचाच अर्थ असा की, जर एखाद्या आरागिरणीचे स्थानांतर अशा गिरणीच्या क्षेत्राच्या वन विभागाच्या हद्दी बाहेर करायचे असल्यास त्या प्रकरणी संबंधित दोन्ही विभागीय वन अधिकाऱ्यांच्या विचार विनिमयानुसार अशा प्रकरणी आपणांस योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेल्या परिस्थितीचा विचार करता, या प्रकरणी आपण सुचविल्याप्रमाणे नियमित सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.

स्वाक्षरित/-
[र.वा.उपाध्याय.]
महसूल व वन विभाग